CMYK

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

सुविचार

जुना इतिहास घोकण्यापेक्षा, नवा इतिहास निर्माण करणे गरजेचे आहे.



गोरगरिबांचे पैसे बुडवणाऱ्या पार्वती मल्टिस्टेट विरोधात धरणे आंदोलन

पेज 4

■ धाराशिव ■ दैनिक ■ वर्ष 2 रे ■ अंक 178 ■ शुक्रवार,दि .8 ऑगस्ट 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर साडेतीनशे तक्रारींचा पाऊस

## जिल्हा प्रशासनाच्या अकार्यक्षमतेवर बोट ठेऊन मंत्र्यांचे खडे बोल

### कलेक्टर, एसडीएम आणि तहसीलदार यांना लोकांचे प्रश्न सोडवण्याची दिली तंबी

आरंभ मराठी | धाराशिव

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या धाराशिव दौऱ्यात जिल्हा प्रशासनाची अकार्यक्षमता उघड झाली. महसूल मंत्र्यांनी आयोजित केलेल्या जनता दरबारात साडेतीनशे पेक्षा अधिक तक्रारींचा पाऊस पडला. यावेळी शेतरस्ते, पानंदरस्ते आणि इतर किरकोळ तक्रारींची संख्या मोठ्या प्रमाणात होती. या तक्रारी पाहून महसूल मंत्र्यांनी डोक्याला हात लावला. जिल्हा प्रशासन शेतरस्ते आणि पानंद रस्त्याचे किरकोळ प्रश्न सोडवत नसेल तर नेमके काय काम करते? असा प्रश्न मंत्री महोदयांनी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांना केला. यावेळी तक्रार घेऊन आलेल्या नागरिकांनी जिल्हा प्रशासन कुठल्याच तक्रारीची दखल घेत नाही, तक्रारींचा पाठपुरावा करत नाही अशी कैफियत मंत्र्यांसमोर मांडली. साडेतीनशे पैकी जवळपास सव्वाशे तक्रारी या फक्त शेतरस्ते आणि पानंद रस्त्यांच्या संदर्भात होत्या. महसूल मंत्र्यांनी सर्व तक्रारींचा स्वीकार करून या तक्रारी ताबडतोब निकाली काढण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला दिले. महायुती सरकारने गतिमान सरकार चालवण्याचा नारा दिला असताना धाराशिव जिल्ह्यातील प्रशासन मात्र त्यालाच हरताळ फासत असल्याचे सांगत बावनकुळे यांनी स्पष्टपणे नाराजी व्यक्त केली. महसूल मंत्र्यांच्या केवळ एका आवाहनाला प्रतिसाद देत साडेतीनशे तक्रारी दाखल झाल्या याचे त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. केवळ ४८ तासात निकाली लागू शकतात अशा तक्रारीची संख्या जास्त असल्यामुळे प्रशासन काम करते की नाही असा प्रश्न पडतो असे बावनकुळे यावेळी म्हणाले. गुरुवारी (दि.७) महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे धाराशिवच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी तीन तास जनता दरबार घेतला. यामध्ये जवळपास ३५ विषयांना न्याय द्यायचा त्यांनी प्रयत्न केला. येत्या काळात राज्य सरकारच्या माध्यमातून शेतरस्ते, पानंदरस्ते, शिवरस्ते मोकळे करण्यासाठी विशेष मोहीम राबविणार असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. जिथे कसलाच शेतरस्ता उपलब्ध नाही तिथे बारा फुटांचा कायमचा शेतरस्ता उपलब्ध करून देणार असून, प्रत्येक शेतरस्ता आणि पानंद रस्त्याला नंबर देणार असल्याचे त्यांनी सांगितले. शेतरस्त्यांचे वाद टाळण्यासाठी सीमेवर वृक्षारोपण करण्यात येणार असून, ही झाडे तोडणाऱ्या व्यक्तीवर गुन्हे दाखल करण्यात येतील असेही ते म्हणाले. पवनचक्की संदर्भात एक विंड मिल पॉलिसी लवकरच तयार करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. कृत्रिम वाळू तयार करण्यासाठी धाराशिव जिल्ह्यात १०० क्रशर तयार करण्याची तयारी दाखवली असल्याचेही ते म्हणाले. वर्ग २ जमिनीच्या प्रश्नासंदर्भात येत्या काही दिवसात अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. नायब तहसीलदार आणि तहसीलदार स्तरावर जी प्रकरणे प्रलंबित आहेत ती प्रकरणे तीन महिन्यात निकाली काढण्याचे आदेश दिल्याचे त्यांनी सांगितले. केवायसी नसल्यामुळे विविध योजनांचा लाभ डीबीटी द्वारे न मिळालेल्या लाभार्थ्यांची तलाठ्यांच्या माध्यमातून केवायसी करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेणार असल्याचेही बावनकुळे म्हणाले.







### लोकशाही दिन घेण्याची प्रशासनाला तंबी

प्रशासनाने जिल्हा आणि तालुका स्तरावर लोकशाही दिन घेऊन जास्तीत जास्त प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत अशी तंबी मंत्र्यांनी यावेळी दिली. कलेक्टर यांनी आठवड्याला १, एसडीएम यांनी २ आणि तहसीलदार यांनी आठवड्याला ३ गावांचे प्रश्न सोडवण्याचे उद्दिष्ट ठेवून काम करावे असे सांगितले. तसेच लोकशाही दिन घेऊन लोकांच्या प्रश्न समजून त्यावर काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. वर्तमानपत्रातील बातम्यांची दखल घेऊन त्यावर काम करण्याचा देखील त्यांनी सल्ला दिला.

### पवनचक्की संदर्भात २१ तारखेला बैठक

महसूल मंत्री बावनकुळे यांना यावेळी पवनचक्की कंपन्यांच्या विरोधात शेतकऱ्यांनी अनेक तक्रारी दिल्या. पवनचक्की कंपन्यांच्या संदर्भात सर्वसमावेशक धोरण नसल्यामुळे शेतकऱ्यांची पिळवणूक होऊन ग्रामीण भागात गुंडगिरी फोफावत असल्याचे बावनकुळे यांनी मान्य केले. धाराशिव जिल्हा प्रशासनाकडे सध्या शेतकऱ्यांच्या २८५ तक्रारी दाखल असून, धोरण नसल्यामुळे यावर कुठला तोडगा काढणे अवघड जात असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. याच मुद्द्यावर मंत्री बावनकुळे यांनी २१ ऑगस्ट रोजी मंत्रालयात यासंदर्भात बैठक घेऊन राज्यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. हे धोरण निश्चित केल्यानंतर पवनचक्की कंपन्या आणि शेतकरी यांच्यात वाद होणार नाहीत असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### शेतकरी कर्जमाफीसाठी समिती गठीत

शेतकऱ्यांची कर्जमाफी हा विषय सध्या ऐरणीवर असून, यावर बोलताना बावनकुळे यांनी कर्जमाफीचे संकेत दिले. महायुती सरकारने शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते त्याची जाणीव असून, सरसकट कर्जमाफी करण्यापेक्षा गरजवंत शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी अशी सरकारची भावना असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या एक समिती नेमली असून, ज्या शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती चांगली नाही अशा शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यासाठी शासन कटिबद्ध असून, समितीचा अहवाल आल्यानंतर कार्यवाही केली जाईल असे ते म्हणाले. परंतु, या समितीचा अहवाल कधी येईल या प्रश्नावर त्यांनी उत्तर दिले नाही.

# रस्त्याच्या दुरवस्थेवर नागरिकांसह शाळकरी मुलांचा उसळला उद्रेक

## प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी नूतन शाळेसमोर केले दोन तास आंदोलन



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहरातुन जाणाऱ्या बार्शी – बोरफळ राज्य मार्गाचे लवकर सुरु करावे तसेच यामध्ये फक्त रस्तेच नव्हे तर दोन्ही बाजूने नाल्या, रस्त्यामध्ये दुभाजक, फुटपाथ व दिवाबत्तीचीही तरतूद करावी. तसेच राजमाता जिजाऊ चौक ते उंबरे कोटा या मंजूर रस्त्याचे काम तातडीने सुरु करावे, शहरातील १४० कोटीतून होणाऱ्या ५९ डीपी रस्त्यांचीही कामे हाती घ्यावीत या प्रमुख या मागण्यासाठी धाराशिव शहर वासियांनी आर. पी. कॉलेज समोर रास्ता रोको आंदोलन केले. यामध्ये शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

''आक्रोश रस्त्यांचा हक्क जनतेचा'' अशा घोषणा देत शेकडो नागरिक रस्त्याची कामे व्हावीत या मागणीसाठी रस्त्यावर उतरली. बार्शी धाराशिव बोरफळ राज्य मार्ग शहरातून जात आहे. या कामाचा कार्यारंभ आदेश ९ ऑक्टोबर २०२४ रोजी निघाला आहे. राजमाता जिजाऊ चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते सांजा गावापर्यंत दोन्ही बाजूने नाल्या, दुभाजक व दिवाबत्ती या सोयीचा समावेश करावा अशी मागणी यावेळी करण्यात आली. राजमाता जिजाऊ चौक ते उंबरे कोटा हा रस्ता देखील मंजूर असून त्याचेही काम तातडीने करावे तसेच शहरातील १४० कोटीच्या ५९ डीपी रस्त्याची निविदा प्रक्रिया होऊनही काम होत नव्हते. तेव्हा जनआंदोलन करून व उपोषणाचे हत्यार उपसल्यावर प्रशासन जागे झाले होते. पण पुन्हा त्याला विलंब होत असून त्याचेही स्मरण या आंदोलनात करून दिले आहे. शिवाय या राज्य मार्गाच्या कामाला प्रत्यक्षात सुरवात होण्याअगोदर रस्त्यावरील खड्डे पाऊस असेल तर सिमेंट कॉंक्रेटन बुजवावे, पाऊस असेल तर डांबरीकरणातून रस्त्याची दुरुस्ती करावी असेही निवेदनात म्हटले आहे. यावेळी शहरातील नागरिक व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रशासनाचे लेखी उत्तर

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांनी पत्रात म्हटले की, राजमाता जिजाऊ चौक ते सांजा या रस्त्याच्या दोन्ही बाजूने नाली, फुटपाथ, पथदिवे व दुभाजक ही अधिकचे कामे समाविष्ट करण्यासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार आहे. त्याच अंदाजपत्रक बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सुधारित प्रशासकिय मान्यता मिळाल्यानंतर काम हाती घेण्यात येईल. कंत्राटदारास रस्त्यावरील खड्डे स्थापत्य अभियांत्रिकी व प्रचलीत पद्धतीनुसार तात्काळ भरण्याचे आदेश देण्यात आल्याचं लेखी कळविले आहे. जिजाऊ चौक ते उंबरे कोटा या रस्त्यावरील खड्डे पावसाची उघडीप मिळताच डांबरीकरण करून बुजवण्यात येतील, असं लेखी आश्वासन नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांनी दिले.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एकाच दिवशी दोन देहदान,१५ दिवसात तिसरे दान

## महाविद्यालय प्रशासनाने मानले नातेवाईकांचे आभार

आरंभ मराठी | धाराशिव

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात गुरुवारी दिवसभरात मरणोत्तर २ देहदान झाले. तर १५ दिवसात ३ देहदान झाले असून, समाजहित आणि व्यापक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवणाऱ्या देहदान झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांचे वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहान यांनी आभार मानले. समाजहिताच्या कार्यामुळे वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन क्षेत्राला मोलाची मदत होणार असून, इतरांसाठीही एक सकारात्मक संदेश असल्याचे त्यांनी सांगितले. १६ दिवसांपूर्वी म्हणजे २२ जुलै रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कमल मुंडे यांचे पहिले देहदान झाले होते.

गुरुवारी कै.सुभाष काशिनाथ सूर्यवंशी (वय ७५, सोलापूर, सेवानिवृत्त शिक्षक) यांचे देहदान झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांची दोन मुले नितीन व सतोष सूर्यवंशी यांनी जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान श्रीक्षेत्र नानीजधाम यांच्या प्रेरनेने देहदानाची इच्छा व्यक्त केली.दुसरे देहदान कै.श्रीमती सिताबाई बापुराव रणदिवे (वय ७०) यांचे करण्यात आले. त्यांचे चुलत नातु दत्ता रणदिवे व उपसरपच सतिष खराटे यानी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपस्थित राहून देहदानासाठी पुढाकार घेतला.या दोन्ही देहांचा वैद्यकीय शिक्षण व संशोधनासाठी उपयोग करण्यात येणार आहे. शरीररचना विभागाच्या नियोजनाखाली ही संपूर्ण प्रक्रिया पार पडली. या कार्यात डॉ. स्वाती पाढरे (प्राध्यापक व विभाग प्रमुख, शरीररचना विभाग), डॉ. सुवर्णा आनंदवाडीकर (सहाय्यक प्राध्यापक), डॉ. तानाजी लाकाळ (वैद्यकीय अधीक्षक), डॉ. विश्वजीत पवार (प्राध्यापक, न्यायवैद्यकशास्त्र), प्रशात बनसोडे, पंकज कसबे प्रयोगशाळा तज्ञ तसेच इतर अधिकारी व कर्मचारी यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता.



### मानवतेची सर्वोच्च सेवा

संपूर्ण प्रक्रियेसाठी मार्गदर्शन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेद्र चौहान यांचे लाभले. त्यांनी देहदान करणाऱ्या कुटुंबीयांचे विशेष आभार मानले आणि हे कार्य वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण व प्रशिक्षणासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले.

देहदान ही मानवतेची सर्वोच्च सेवा असून, समाजातील इतरांनीही याचा आदर्श घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाने केले आहे.





CMYK

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

संपादकीय शुक्रवार,दि .8 ऑगस्ट 2025

# बॅक बेंचर..

**"The** best brains of the nation may be found on the last benches of the classroom."'' अर्थात ''सर्वाधिक बुद्धिमान मुले ही शेवटच्या बाकावर असतात.'' हे वाक्य डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे आहे. त्यांच्या या वाक्याकडे फक्त प्रेरणादायी वाक्य म्हणून न पाहता त्यामागील वास्तवता समजून घेणे आवश्यक आहे. याच संदर्भात मागच्या आठवड्यात केरळ राज्यातील कोल्लम जिल्ह्यातील वालकोम या गावातील एका शाळेच्या गोलाकार बेंच असलेल्या वर्गरचनेचा फोटो सोशल मीडियावरून सर्वत्र व्हायरल झाला. या शाळेतील गोलाकार बेंच रचनेमुळे आता कोणताही विद्यार्थी 'बॅक बेंचर' म्हणजेच शेवटच्या बाकावर बसणारा राहिलेला नाही.

आपल्याकडे बहुतांश शाळांमध्ये हुशार मुले सुरुवातीच्या दोन बेंचांवर बसतात, मध्यम प्रगती असणारी मुले मधल्या बेंचांवर बसतात आणि अभ्यासात मागे राहणारी मुले शेवटच्या बेंचावर बसतात. ही मुले अनेकदा 'ढ' म्हणून हिणवली जातात. शिक्षकांचे लक्ष प्रामुख्याने पुढच्या बाकांवर असते. इतर विद्यार्थीही या मागच्या बेंचावर बसणाऱ्या मुलांची टवाळी करतात. परिणामी या विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड निर्माण होतो, आत्मविश्वास कमी होतो. अनेकदा सतत अपमानित झाल्यामुळे ही मुले शाळा चुकवतात किंवा शिक्षण अर्धवट सोडतात.

मी स्वतः शालेय जीवनात नेहमी पुढच्या दोन बेंचांवर बसत असे. कारण माझा अभ्यास चांगला होता आणि परीक्षेतील कामगिरी नेहमी उत्कृष्ट असायची. मात्र, आज जेव्हा माझे शालेय मित्र भेटतात, तेव्हा लक्षात येते की माझ्या वर्गातील जे विद्यार्थी मागच्या बेंचावर बसत असत, ते आज प्रगतशील बागायतदार, गॅरेज चालक, राजकारणी व उद्योजक झालेले आहेत. त्यांचे आर्थिक उत्पन्न हे माझ्यापेक्षा दुप्पट ते तिप्पटीने जास्त आहे. काही जणांचा शेतमाल परदेशात पाठवला जातो. एका मित्राने उभे केलेल्या वेल्डिंग गॅरेजमध्ये वाहन दुरुस्तीसाठी एक महिन्याची ॲडव्हान्स बुकिंग असते.

या उदाहरणांवरून स्पष्ट होते की ज्यांना 'ढ' समजले गेले, तेच आज समाजासाठी अधिक उपयुक्त सिद्ध झाले आहेत. आमच्या गप्पांमध्ये आम्ही असा निष्कर्ष काढतो की, सामान्यतः पुढच्या बेंचावर बसणारे विद्यार्थी शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनिअर होतात. मधल्या बेंचांवरील मुले ५०–७० टक्के गुण मिळवून वकील, प्रगतशील शेतकरी, वर्ग एक आणि दोन चे अधिकारी होतात. तर शेवटच्या बेंचावर बसणारी मुले राजकारणी, अध्यात्मिक गुरू, खेळाडू किंवा तृतीय–चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी होतात. मात्र अनेकदा हेच लोक पुढे जाऊन पुढच्या बेंचावर बसलेल्या लोकांना नोकरी देतात.

या सगळ्यात विसंगती वाटली तरी डॉ. अब्दुल कलाम यांच्या वाक्यानुसार यामध्ये वास्तवता आहे. केरळमधील शाळेने पारंपरिक वर्गरचनेला छेद देत गोलाकार बेंच रचना स्वीकारली आहे. यामुळे वर्गातील सर्व विद्यार्थ्यांकडे शिक्षक समान लक्ष देऊ शकतात. 'ढ' व 'हुशार' ही भेदभाव करणारी चुकीची कल्पना मोडून काढली जाईल. कारण कोणताच विद्यार्थी 'ढ' नसतो. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता वेगळी असते. केवळ भाषा, गणित, विज्ञान या विषयांमध्ये चांगले गुण मिळाले म्हणून काहींना हुशार ठरवणे म्हणजे इतर विद्यार्थ्यांवर अन्याय करणं होय.

खेळ, संगीत, अभिनय, नाट्य, व्यवहारज्ञान, जनसंपर्क अशा अनेक क्षेत्रांमध्ये प्राविण्य असणारी मुले अभ्यासात मागे राहू शकतात, पण त्यांची तीच खरी बुद्धिमत्ता असते.

शिक्षणतज्ज्ञ हॉवर्ड गार्डनर यांनी त्यांच्या ' ' या पुस्तकात म्हटले आहे की, प्रत्येक व्यक्तीकडे काही विशेष बुद्धिमत्ता असते. त्यांनी मांडलेल्या नऊ प्रकारच्या बुद्धिमत्ता खालीलप्रमाणे आहेत:

१)निसर्गवादी बुद्धिमत्ता निसर्गातील घटकांचा अभ्यास करण्याची क्षमता (उदा. शेतकरी, पर्यावरणतज्ज्ञ)

२)संगीतात्मक बुद्धिमत्ता संगीत समजून घेण्याची व सादर करण्याची क्षमता (उदा. गायक, वादक)

३)तार्किक–गणितीय बुद्धिमत्ता समस्यांचे विश्लेषण करण्याची क्षमता (उदा. शास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ)

४) अस्तित्ववादी बुद्धिमत्ता जीवनाच्या अर्थाचा शोध घेण्याची क्षमता (उदा. धर्मगुरू)

५)आंतरवैयक्तिक बुद्धिमत्ता इतरांची मनोभूमिका समजण्याची क्षमता (उदा. नेते, शिक्षक)

६) शारीरिक–कौशल्यात्मक बुद्धिमत्ता शरीराचा अचूक वापर करण्याची क्षमता (उदा. खेळाडू, नर्तक)

७)भाषिक बुद्धिमत्ता भाषेचा प्रभावी वापर करण्याची क्षमता (उदा. लेखक, कवी)

८) अंतरावैयक्तिक बुद्धिमत्ता स्वतःच्या भावना समजण्याची व त्या सांभाळण्याची क्षमता (उदा. योगगुरू)

९) अवकाशीय बुद्धिमत्ता दृश्य गोष्टींची अचूक समज असणारे (उदा. वास्तुविशारद, चित्रकार)

याचा अर्थ प्रत्येक विद्यार्थ्याजवळ काही ना काही खास बुद्धिमत्ता असते. शिक्षकांनी ही बुद्धिमत्ता ओळखणे आणि त्या दिशेने प्रोत्साहन देणे महत्त्वाचे आहे. पालकांनीही आपल्या मुलांमधील नैसर्गिक गुण शोधून त्यांचा विकास करावा. शेवटी कोणताही विद्यार्थी 'ढ' नसतो, हे आता आपण सर्वांनी मान्य केले पाहिजे.



किशोर जाधव
सोलापूर
मो. ९९२२८८२५४१

## काक्रंबा येथून तीन लाखांच्या विदेशी दारूची चोरी

**आरंभ मराठी | तुळजापूर**

विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या गाडीवर दरोडा टाकून गाडीतील तीन लाख रुपये किंमतीची दारू चोरल्याची घटना तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा गावात घडली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, फिर्यादी हणुमंत विश्वनाथ चोपडे (वय २७ वर्षे, रा. मुतखेड ता. पालम जि. परभणी) हे आयशर टॅम्पो (क्र एमएच२६ बी.ई. ९३८७) मध्ये इस्लामपुर येथील राजाराम बापु पाटील सहकारी साखर कारखाना राजाराम नगर येथुन घेऊन जात असताना तुळजापूर रस्त्यावरून जात होते. त्यावेळी काक्रंबा गावाच्या पुलाजवळ कच्च्या रस्त्यावरुन जात असताना काक्रंबा येथे अज्ञात चार व्यक्तीने टॅम्पोमध्ये चढून टॅम्पोतील माल चोरुन नेला. चोरट्यानी ऑफीसर चॉईस ब्ल्यु प्युअर ग्रीन विस्की विदेशी दारुचे २८ बॉक्स, ऑफीसर चॉईस प्रेस्टीज विस्की कंपनीचे ३ बॉक्स, असा एकुण ३,१०,००० किंमतीचा माल दिनांक ५ ऑगस्ट रोजी रात्री दीड वाजता चोरला. हणुमंत चोपडे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२),३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## रानडुकराची शिकार प्रकरणी दोघांवर कारवाई

**आरंभ मराठी | सातारा**





सातारा वन विभागाच्या अधिकाऱ्यांना भरतगाववाडी ता. जि. सातारा येथे रानडुकराची संशयतांनी शिकार केल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास केला असता भरतगाववाडी येथील स्थानिक नाव म्हसोबा या ठिकाणी विजेच्या तारेच्या धक्याने (करंट) वन्यप्राणी रानडुक्कराची अवैधरित्या शिकार झालेचे तपास पथकाच्या निदर्शनास आले त्यावरून घटनास्थळी मृत वन्यप्राणी रानडुक्कर (नर )जातीचे तसेच शिकारीसाठी वापरण्यात आलेले औजारे सापडली. याप्रकरणी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी या शिकार प्रकरणी संशयित आरोपी १) पंकज गणपत घोरपडे (वय ४० ) वर्षे रा. भरतगाववाडी ता.जि.सातारा. व महेश मारुती पडवळ (वय २६) वर्षे रा. भरतगाववाडी ता.जि.सातारा घटनास्थळी मिळून आले.घटनास्थळी मृत वन्यप्राणी रानडुक्कर नर व इतर साहित्य जप्त केले. वनअधिकारी यांनी परिसराची कसून तपासणी केली.सदर संशयित आरोपी यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असून आरोपी यांचेवर वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अन्वये गुन्हा नोंद केलाआहे. सदरची कारवाई श्री. अमोल सातपुते उपवनसंरक्षक (प्रा.) सातारा व श्री. प्रदीप रौंधळ सहाय्यक वनसंरक्षक (वनीकरण) सातारा यांचे सखोल मार्गदर्शनाखाली श्री. संदीप जोपळे वनक्षेत्रपाल प्रादेशिक सातारा,श्री. सुनील शिंदे वनपाल सातारा, श्री.अभिजीत कुंभार वनरक्षक भरतगाव, मुकेश राऊळकर वनरक्षक सातारा, श्री.सुहास काकडे वनरक्षक परळी, संतोष दळवी वाहन चालक व इतर कर्मचारी यांनी केली.वन्यप्राण्यांची शिकार करताना कोणी निदर्शनास आलेस महाराष्ट्र वन विभागाच्या टोल फ्री नंबर १९२६ वरती संपर्क साधावा किंवा नजीकच्या वनक्षेत्रपाल कार्यालयास तात्काळ माहिती देण्यात यावी.मानव वन्यजीव संघर्ष बाबतीत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेचा लाभ घ्यावा.पिक नुकसानी झालेस त्वरीत माहिती देण्यात यावी. असे आवाहन सातारा वन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मालवाहतूक गाडीची पेट्रोलिंग करणाऱ्या पोलिस व्हॅनला धडक; पोलीस हेड कॉन्स्टेबलचा मृत्यू

**आरंभ मराठी | येरमाळा**





सोलापूर धुळे राष्ट्रीय महामार्गावरील चोराखळी पाटीजवळ उभ्या असलेल्या गाडीची पोलीस चौकशी करत असताना पाठीमागून आलेल्या मालवाहतूक ट्रकने पोलीस गाडी व ईरटीगा कारला जोराची धडक दिल्याने एक पोलीस कर्मचारी ठार झाल्याची घटना मध्यरात्री तीन वाजेच्या सुमारास घडली. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, पोलीस मुख्यालयाच्या गाडीद्वारे राष्ट्रीय महामार्गावर पेट्रोलिंग करत असलेले पो.हे.कॉ.श्रीराम कांबळे आणि चालक पोउनि दिनकर जाधवर फोर्स लाईट व्हॅन (क्र. २५..०८५६) मध्ये चोराखळी पाटीजवळ आले असता, येथून जवळच एक ईरटीगा कार (१४..३४७८) रस्त्याच्या कडेला उभी राहिली. त्या गाडीची चौकशी करण्यासाठी पोलिसांनी गाडीजवळ येऊन गाडी चालकास विचारपूस केली व परत आपल्या सरकारी गाडीकडे जात असताना येरमळ्याकडून येडशीकडे भरघाव वेगाने येणाऱ्या मालवाहतूक ट्रक (क्र. ३८७२३९) च्या चालकाने त्याचे वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे व हयगयीने चालवून पेट्रोलिंग वाहन आणि ईरटीका कारला रोडच्या खाली उभी असताना देखील पाटीमागून जोराची धडक दिली. या अपघातामध्ये पो.हे.कॉ.श्रीराम इरप्पा कांबळे हे गंभीर जखमी झाले असल्याने त्यांना जिल्हा शासकीय रुग्णालय, धाराशिव येथे उपचारासाठी दाखल केले. परंतु, उपचार सुरु असतानाच त्यांचे निधन झाले. चालक दिनकर जाधवर तसेच इरटीगा (क्र. १४ ३४७८) मधील प्रवासी जखमी झाले असून त्यांना जिल्हा रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. पोहेकॉ विशाल गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भोजगुडे हे करीत आहेत.

# नैतिक मूल्यांचा ऱ्हास...

**कोणत्याही** देशासाठी एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची असते. तिथल्या नागरिकांमध्ये नैतिक मूल्य असावी लागतात. कोणत्याही धर्म, जात आणि पंथाच्या लोकांना त्या देशात मान–सन्मान मिळायला हवा. आज आपला देश प्रगतीच्या दिशेनं मार्गक्रमण करतोय. पण आजकाल दोन समाजांमध्ये वाद, भांडणं आणि त्याचं रूपांतर हिंसेमध्ये अगदी सहज होत आहे. धर्माच्या नावावर, जातीच्या नावावर रक्तपात घडवून आणले जात आहेत. अंधश्रद्धा, अज्ञानता, व्यसनाधिनता, भांडण–तंटे, स्वार्थ, विश्वासघात, गृहकलह, नात्यातील अविश्वास, भ्रष्टाचार इत्यादी जुन्या समस्यांसुद्धा कायम आहेत. शिक्षणामुळे सुद्धा त्यात फारसा फरक पडलेला नाही आणि पडणार देखील नाही. कारण समाजात शिक्षणाच्या नावाखाली जे काही शिकविले जाते त्यातून विद्यार्थी पैसा कसा कमवावा? याचे कौशल्य तर आत्मसात करतात मात्र नैतिक वर्तन कसे करावे? याचे कौशल्य आत्मसात करीत नाहीत. कारण त्यांना ते शिकवलेच जात नाही. माणूस म्हणून कसे वागावे ? दुस–यांच्या प्रती दया,करूणा, त्याग व निःस्वार्थ प्रेम कसे करावे ? यासंबंधीचे शिक्षण कुठल्याही विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात सामील नाही. पालक सुद्धा आपल्या मुलांवर नैतिक संस्कार करण्यात सपशेल अपयशी ठरत आहेत. कारण ते स्वतःच नैतिक मुल्यांनी रिकामे आहेत. परिणामी मूल्यहीन पिढी अस्तित्वात येत आहे व त्यांची संख्या पिढीगणिक वाढत आहे. अशा परिस्थितीमध्ये एखादा देश प्रगती करतही असेल, तरी ती प्रगती फार काळ टिकणं अशक्य आहे. सोशल मीडियाचा शोध दूर असलेल्या लोकांना एकत्र आणण्यासाठी आणि त्यांच्यात संवाद साधण्यासाठी लागला होता, पण आता त्याचे विपरित परिणाम दिसू लागले आहेत. विशेषतः तरुण पिढी त्यात जास्तच गुंतत गेली आहे. ती या आभासी दुनियेलाच सर्वस्व मानायला लागली आहे. इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सअॅप, स्नॅपचॅट ही अॅप्स अक्षरशः तरुण व किशोरवयीन मुला–मुलींना वेड लावत आहेत. परिणामी त्यांच्यासाठी मोबाईल जीव की प्राण होत चालला आहे. सोशल मीडियाच्या आहारी जाऊन लोक सोशल न राहता एकलकोंडे होत आहेत. सोशल मीडियात वनवे कम्युनिकेशन मुळे लाईक्स, कमेंट, व्ह्युव्हज या गोष्टी म्हत्वाच्या वाटु लागल्या आहेत. आनंद म्हणजे पैसा आणि प्रसिद्धी असाच समज वाढत आहे. त्यातून तरूण स्वत:च स्वत:च आभासी जग तयार करून त्यात रममान होत आहेत.मोबाईल वरील अश्लील सामुग्री, ओटीटी प्लेटफार्मस, चित्रपट आणि टिव्ही वरील दर्जाविहीन कार्यक्रमांमुळे समाज खालपासून वरपर्यंत नासत चाललेला आहे व ह्या नासण्याच्या प्रक्रियेपासून समाजाला वाचविण्याचा कोणताच मार्ग दिसत नाहीये, ही समस्या आता विद्यापीठ, महाविद्यालयांतून झिरपत माध्यमिक शाळांपर्यंत येऊन पोहोचली आहे., मुलांच्या हाती मोबाईल देणे गरजेचे आहे परंतु त्या मोबाईलमधील अश्लील सामुग्रीच्या वाईट परिणामांपासून आपल्या मुला–मुलींना कसे वाचवावे, हे पालकांना कळत नाहीये. या सामुग्रीमुळे तरूणच नव्हे तर सर्व वयोगटातील लोकांच्या लैंगिक अभिरूची आणि वर्तनामध्ये कमालीचे बदल झालेले आहेत. या सर्वाचा परिणाम म्हणून देशातील स्त्रिया असुरक्षित झालेल्या आहेत. शालेय, महाविद्यालयीन मुलींवर आणि महिलांवरील लैंगिक अत्याचाराच्या आणि छेडछाडीच्या देशाच्या कानाकोपऱ्यांतील बातम्या वाचल्या आणि मन अगदी सुन्न आणि अस्वस्थ झालंय. समाजात राजकारणाचे गुन्हेगारीकरण किंवा गुन्हेगारांचे राजकारीकरण मोठ्या प्रमाणावर वाढत चालले आहे. शिक्षणाचे बाजारीकरण झाले असून बेरोजगारी मुळे समाजातील तरूण गुन्हेगारी कडे वळत आहेत. समाजामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. भारतीय समाजाच्या सामाजिक आणि मानसिक नैतिकतेवर अंतराष्ट्रीय पातळीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होतोय हे खूप खेदजनक आणि लांच्छनास्पद आहे. चार्ल्स डार्विनने आपल्या नैसर्गिक निवडिच्या सिद्धांतात म्हटलं आहे, निसर्गच कुणाला जगु द्यायच आणि कुणाला नाही हे ठरवतो. सक्षम असतील तेच टिकतील. मग माणुस तरी याला अपवाद कसा राहील. आज माणसांमध्ये जगण्यासाठी जीवघेणी स्पर्धा सुरू झाली आहे. त्यामुळे तो पैशाला इश्वराचे जणू स्थान देवून पूजायला लागला आहे. आज झगमगाटाच्या दुनियेत अधिकाधिक संपत्ती, बंगला, गाडी, फ्लॅटस या बाबींना त्यान स्टेटस सिंबाल बनवलं आहे व एवढा आत्ममग्न झाला आहे की, समाजापासून दूर व्हायला लागला आहे. एकएकट्याचा, स्वतःचाच विचार करण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. आज जो–तो केवळ यंत्रासारखा पळतो आहे. एक–दुस–याला मदत करण्याची भावना कमी होत चालली आहे. भारतीय समाज आपल्या सामाजिक प्रश्नाच्या जटील सोडवणुकीत मात्र दिवसेंदिवस नैतिक अध:पतनाकडे का जातोय हा प्रश्न मात्र अस्वस्थ करून सोडतोय..



सुरेश मंत्री
अंबाजोगाई.
मो ९४०३६५०७२२

### स्पेलिंग बी स्पर्धेत पानगाव झेडपी शाळेच्या विद्यार्थ्यांचे यश

**येरमाळा** – जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मयांक घोष यांच्या संकल्पनेतून बीट स्तरावर 'स्पेलिंग बी' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार येरमाळा बीटमध्ये घेण्यात आलेल्या स्पर्धेत पानगावच्या जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे. पानगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील तीन विद्यार्थ्यांची तालुका स्तरावर निवड झाली आहे.

# आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे कार्य कायम स्मरणात ठेवले जाईल

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून राणा पाटील यांचे कौतुक

### तुळजापूर येथे आमदार राणा पाटील यांचा भव्य नागरी सत्कार

**आरंभ मराठी | तुळजापूर**

आई तुळजाभवानीच्या तुळजापूरचा कायापालट करण्याचे पवित्र कार्य आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हातून घडत असून, हे कार्य अनेक वर्षे स्मरणात ठेवले जाणार असल्याचे गौरवोद्गार महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तुळजापूर येथे आयोजित केलेल्या नागरी सत्कारात काढले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून माजी आमदार सुजितसिंह ठाकूर ,राजाभाऊ राऊत ,जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे, अर्चनाताई पाटील, युवा नेते विनोद गंगणे, माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, बाळासाहेब शिंदे, माजी सभापती विजय गंगणे, महंत मावजीनाथ महाराज, महंत तुकोजी बुवा महाराज, महंत चिलोजीबुवा महाराज, महंत इच्छागिरी महाराज, महंत व्यंकटअरण्य महाराज उपस्थित होते . यावेळी बोलताना बावनकुळे म्हणले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी चौंडी येथील मंत्रिमंडळाच्या बैठकीत तुळजापूर विकास आराखड्यास मंजुरी दिली होती. या विकासा आराखड्यासाठी आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी पाठपुरावा केला होता. तसेच हे कार्य घडवण्यासाठीच आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांचा जन्म झाला असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले. बावनकुळे पुढे म्हणाले की, आई जगदंबेच्या या पवित्र नगरीमध्ये एका कर्तृत्ववान नेत्याचा सत्कार करण्याचे भाग्य मला लाभले असून, देव देश धर्माकरिता कार्य करणारे अमर राहतात तसेच तुळजापूरच्या जनतेचे आभार आहेत की त्यांनी राणाजगजितसिंह पाटील यांना निवडून देऊन विधानसभेत पाठवले आहे. देशातील सर्वात संपन्न राज्य हे महाराष्ट्र झाले पाहिजे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वप्न असून महाराष्ट्राच्या खऱ्या विकासाला सुरुवात झाली असल्याचेही बावनकुळे यांनी म्हटले. समाजाचे दुःख आपलं म्हणणारे नेते राणाजगजीतसिंह पाटील असून आगामी काळात लाडक्या बहिणींना २१०० रुपये मिळणार असल्याचेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले. सत्काराला उत्तर देताना आमदार राणा पाटील यांनी तुळजापूर मंदिर विकास आराखडा राबवत असताना सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्याचा निश्चय केला. महायुती सरकारच्या माध्यमातून गतिमान सरकार काम करत असून, आई तुळजाभवानीच्या आशीर्वादाने हे सरकार राज्याचे कल्याण करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी तालुकाध्यक्ष आनंद कंदले, सुनील चव्हाण, संतोष बोबडे, दिनेश बागल, राजेश्वर कदम, निलेश रोचकरी, धैर्यशील दरेकर, समर्थ पैलवान, रोहित चव्हाण यांच्यासह भाजपचे पदाधिकारी महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते..



### पहिल्या दहा आमदारात राणाजगजितसिंह पाटील यांचे नाव

राणाजगजीतसिंह पाटील हे उत्कृष्ट कार्य करणारे आमदार असून, महाराष्ट्रातील पहिल्या दहा आमदारांमध्ये त्यांचा क्रमांक लागतो. अशा कर्तुत्वान नेत्याचा सत्कार करण्याचे भाग्य मला लाभले असल्याचे बावनकुळे म्हणाले.

### लवकरच मंत्रिमंडळात समावेश

यावेळी तुळजापूरचे मा. नगराध्यक्ष सचिन रोचकरी यांनी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा अशी मागणी बावनकुळे यांच्याकडे केली. त्याला उत्तर देताना बावनकुळे म्हणाले की, आई तुळजाभवानीच देवेंद्र फडणवीस यांना सांगणार आहे की आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांचा मंत्रिमंडळात समावेश करा. त्यामुळे लवकरच त्यांचा मंत्रिमंडळात समावेश होण्याच्या आशा उंचावल्या आहेत.

### तुळजापूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

या सत्कार समारंभासाठी तुळजापूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभलेला दिसून आला. संपूर्ण भवानी कुंड हे पूर्णपणे भरलेले होते. गेल्या पंधरा दिवसापासून शहरातील नागरिकांनी व भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी या समारंभासाठी मोठे परिश्रम घेतले होते.

# तुम्हीच वाटोळं केलं अन् आता आंदोलन करताय?

## रास्ता रोको आंदोलनावर शिवसेना जिल्हाप्रमुख साळुंके यांचा सवाल

**आरंभ मराठी | धाराशिव**

भुयारी गटार योजनेच्या नावाखाली शहराचे रस्ते उखडून ठेवले, वाटोळं केलं आणि आता खुद्द तुम्हीच आंदोलन करताय ?, काय नौटंकी आहे, असा सवाल शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी शिवसेना उद्धव ठाकरे गटाला विचारला. गुरुवारी झालेल्या रास्ता रोको आंदोलनावर साळुंके यांनी जोरदार टीका केली. साळुंके यांनी म्हटले आहे की, या शहराची वाट लावणारे आजच आंदोलनकर्ते झाले आहेत. भुयारी गटार योजनेतून कित्येक कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला. कमिशन तुम्हीच खाल्ले. त्या योजनेतील साठवण मालासाठी गोडाऊन तुमच्या शेतात आणि त्याचे दरमहिना १० लाखांचे भाडे तुमच्याच खिशात.धाराशिव शहरासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः पुढाकार घेऊन १४० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यामुळे आता रस्त्यांचे काम प्रत्यक्षात सुरू होणार याची जाणीव होताच, याच मंडळींनी आंदोलनाचा नवा तमाशा उभा केला आहे. ज्यांनी शहराची अधोगती केली, त्यांनी आता आंदोलनाच्या नौटंकीचा नवा खेळ रचला आहे.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

# मनोज जरांगे पाटील यांची पुन्हा एकदा जनतेच्या मनात पकड; धाराशिव दौऱ्यात उत्स्फूर्त प्रतिसाद



आरंभ मराठी | धाराशिव

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर संपूर्ण राज्यात गेल्या दोन वर्षांपासून संघर्ष करणारे, अनेकदा उपोषण आणि सरकारच्या विरोधात थेट आव्हान, यामधून आपली भूमिका स्पष्ट करणारे मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा राज्याच्या राजकीय आणि सामाजिक चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. विधानसभा निवडणुकीदरम्यान त्यांनी घेतलेल्या राजकीय भूमिकेमुळे काही काळ त्यांच्याविषयी संभ्रम आणि काही प्रमाणात नाराजी होती. मात्र, अलीकडे बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख, महादेव मुंडे हत्या प्रकरणात त्यांनी घेतलेल्या आक्रमक आणि निष्पक्ष भूमिकेने अनेकांचे मन जिंकले आहे.त्यामुळे विशेषतः तरुण वर्गात त्यांची क्रेझ वाढली आहे. केज तालुक्यातील मस्सा जोग येथील संतोष देशमुख आणि परळी येथील महादेव मुंडे या युवकांच्या निर्घृण हत्या झाल्यानंतर संपूर्ण बीड जिल्ह्यात संतापाची लाट उसळली होती. या प्रकरणात जरांगे पाटील यांनी थेट भूमिका घेत, प्रशासनावर,सरकारवर प्रश्नांची सरबत्ती केली, आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली. ही हत्या फक्त एका व्यक्तीची नाही, तर एका विचाराची आहे, अशी भूमिका घेत त्यांनी आपण विशिष्ट जातीच्या विरोधात नाही, हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या निर्भीड भूमिकेने विशेषतः मराठा समाजात पुन्हा एक विश्वास निर्माण झाला.

## आरक्षण लढ्यासाठी महाराष्ट्र दौऱ्याची सुरूवात

आरक्षणासाठी आता त्यांनी पुन्हा एकदा मोठा लढा उभारण्याची तयारी चालवली आहे. २९ ऑगस्ट रोजी मुंबईत मराठा समाजासाठी भव्य उपोषण करण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी राज्यभर दौरा सुरू केला असून, या दौऱ्यात लोकांशी थेट संवाद साधणे, त्यांची मते जाणून घेणे आणि आंदोलनाची दिशा ठरवणे हे उद्दिष्ट आहे.

## धाराशिव दौऱ्यात उत्स्फूर्त स्वागत, सर्वपक्षीय पाठिंबा

धाराशिव शहरात मंगळवारी झालेल्या दौऱ्यात त्यांना जोरदार प्रतिसाद मिळाला. शहरातील विविध भागांतून युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने त्यांच्या स्वागतासाठी जमले होते. विशेष म्हणजे, स्थानिक राजकीय वातावरण पाहता सर्वच पक्षांचे पदाधिकारी आणि नेतेमंडळी जरांगे पाटील यांना भेटण्यासाठी हॉटेल साईलीला येथे आली. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट व ठाकरे गट) यांच्यातील स्थानिक नेत्यांनी त्यांच्या उपस्थितीत आपला पाठिंबा दर्शविला.

## तरुणांमध्ये जबरदस्त क्रेझ

दिवसभर जरांगे पाटील जिथे-जिथे गेले तिथे त्यांच्या अवतीभवती तरुणांची प्रचंड गर्दी पाहायला मिळाली. काहींनी त्यांच्यासोबत फोटो काढण्यासाठी रांगा लावल्या होत्या. सोशल मीडियावरही त्यांच्या धाराशिव दौऱ्याचे व्हिडिओ, फोटो आणि भाषणांचे क्लिप्स मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत.

## जनमानसात पुन्हा एकदा उठाव

वधानसभा निवडणुकीत जरांगे पाटील यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे काही मराठा बांधव नाराज होते. मात्र आता परिस्थिती बदलताना दिसत आहे. सामाजिक प्रश्नांवर त्यांची तडफदार आणि निष्पक्ष भूमिका पाहता, त्यांच्याविषयी निर्माण झालेला अविश्वास आता पुन्हा विश्वासात रूपांतरित होत आहे.

## सरकारपुढे नव्या संकटाची चाहूल?

जरांगे पाटील यांची वाढती लोकचळवळ, खासकरून ग्रामीण आणि तरुण वर्गातली जबरदस्त ओढ, ही राज्य सरकारसाठी एक मोठे आव्हान ठरू शकते. आरक्षणाचा मुद्दा पुन्हा पेटण्याची शक्यता असून, मुंबईतील आंदोलनाचा आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या काळात जरांगे पाटील काय भूमिका घेतात, सरकार त्यावर कशी प्रतिक्रिया देते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# तुळजापूर येथील बाजार समितीत नवीन उडीद व मुगाची आवक सुरू

## उडदाला ७५०० तर मुगाला ८००० रुपये भाव

आरंभ मराठी | तुळजापूर



तुळजापूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये बुधवारी (दि.६) खरीप हंगाम २०२५ मधील उडीद व मूग पिकाची आवक सुरू झाली आहे. बाजार समितीमार्फत नवीन उडीद व मूग विक्रीसाठी आणणाऱ्या शेतकऱ्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तालुक्यातील निलेगाव येथील शेतकरी संजय राठोड व धनाप्पा मुळे यांनी बाजारात नवीन उडीद व मूग हा शेतमाल विक्रीसाठी आणला होता. त्यांच्या उडीद पिकास ७००० ते ७५०० व मुगाला ६७०० ते ८००० च्या दरम्यान बाजार भाव मिळाला. यावेळी बाजार समितीचे संचालक संतोष कदम, बालाजी रोचकरी, दत्ता वाघमारे, अडत व्यापारी रेवणसिद्ध बचाटे ,संभाजी मुळे, प्रशांत शेळके, प्रशांत पाटील, सतीश मुंदडा, अंकुश नन्नवरे, शिरीष गावसाने, अक्षय मेहता, गणेश लोमटे यांच्यासह शेतकरी व हमाल मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व शेतकऱ्यांनी आपला शेतमाल वाळवून स्वच्छ केलेला शेतमाल बाजार समितीत विक्रीसाठी आणावा तसेच बाहेरील विनापरवाना जादा दराचे आमिष दाखवून शेतमाल खरेदी विक्री करणारे व्यापारी यांना आपला माल विक्री करू नये व शेतमाल विक्री केल्यानंतर बाजार समितीची प्रमाणित पावती व शेतमाल विक्रीचे पैसे तात्काळ घ्यावेत असे आवाहन बाजार समितीच्या वतीने सचिव उमेश भोपळे यांनी केले आहे.

# तेर येथील महाराजस्व शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## एकाच छताखाली नागरिकांना मिळाल्या शासकीय सोयीसुविधा

आरंभ मराठी | तेर



नागरिकांच्या हितासाठी महाराष्ट्र शासन विविध शासकीय योजना राबवत आहे. या शासकीय योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन धाराशिवच्या तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी केले. धाराशिव तालुक्यातील तेर येथे बुधवारी (दि.६) महसूल विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान कार्यक्रमात डॉ. मृणाल जाधव यांनी उपस्थित नागरिकांना आवाहन केले. यावेळी सरपंच दिदी लोकेश काळे, उपसरपंच श्रीमंत फंड, महसूल मंडळ अधिकारी शरद पवार, माजी सरपंच नवनाथ नाईकवाडी, रेवणसिध्द लामतुरे, रवीराज चौगुले, ग्रामविकास अधिकारी बाबासाहेब खोचरे यांची प्रमुख उपस्थिती होती. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक करण्यासाठी नागरिकांच्या समस्या एकाच ठिकाणी निवारण करण्यासाठी या महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या समाधान शिबिरात फार्मर आय.डी नोंदणी, उत्पन्न, रहिवासी, जातीचे प्रमाणपत्र, रेशन कार्ड के.वाय.सी. श्रावणबाळ, संजय गांधी, वृद्धापकाळ योजना, डी.बी.टी, के.वाय.सी करणे आदी कामकाज करण्यात आले. यावेळी तेर येथील ग्राम महसूल अधिकारी प्रशांत देशमुख आर .आर बेशकराव (हिंगळजवाडी), एस .एल.ईप्पर, (किणी), श्रीमती व्ही. एस. मुळे (काजळा), श्रीमती व्ही.बी.मुंडे (कोळेवाडी), ए.एम.देवगिरे (वाघोली) आदींनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. नागरिकांनी देखील या शिबिरात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# रविकिरण प्राथमिक विद्यालयातून सिंदूर मोहिमेतील सहभागी जवानांसाठी ५० राख्या पाठवल्या

आरंभ मराठी | धाराशिव



धाराशिव येथील रविकिरण प्राथमिक विद्यालय या शाळेने देशभक्तीचा जिवंत संदेश देणारा एक आगळा-वेगळा उपक्रम नुकताच राबविला. भारत सरकारने राबविलेल्या ''सिंदूर मोहिमे''* तील सहभागी जवानांना स्नेहाचे व प्रेमाचे प्रतिक असलेल्या ५० राख्या व शुभेच्छा संदेश शाळेतील विद्यार्थिनींनी पाठविले . हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची भावना रुजवणारा ठरला. या उपक्रमाचे नेतृत्व मुख्याध्यापक प्रवीण माळवदे सरांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणच नव्हे तर सामाजिक व राष्ट्रीय भावनेची जाणीवही करून दिली. वर्गशिक्षिका पूजा राजेनिंबाळकर, सुवर्णा बनसोडे, छाया पांडगळे व सोनल गायकवाड यांनी विद्यार्थिनींना राख्या बनवण्यासाठी मार्गदर्शन केले. मुलींनी स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या विविध रंगी राख्यांमध्ये प्रेम, कृतज्ञता व अभिमान गुंफलेले होते. या संपूर्ण उपक्रमात पोस्टमास्तर रवींद्र देडे यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांनी राख्यांचे पार्सल योग्य ठिकाणी पाठवण्याची व्यवस्था केली. विद्यार्थ्यांनी पाठवलेल्या या राख्यांमुळे जवानांच्या चेहऱ्यावर निश्चितच आनंदाचे हास्य फुलणार असल्याची भावना मु अ .प्रविण माळवदे यांनी व्यक्त केली . ''एक राखी एक अभिवादन देशरक्षकांना!'' हे ब्रीद खऱ्या अर्थाने साकार झाले.

# नळदुर्ग येथील शेतकरी संघर्ष समितीचे महसूल मंत्र्यांना निवेदन

आरंभ मराठी | नळदुर्ग



नळदुर्ग येथील शेतकरी संघर्ष समितीच्या मागण्या संदर्भात मंत्रालयात बैठक घेऊन शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावणार असल्याचे आश्वासन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध मागण्या संदर्भात दिलेल्या निवेदनानंतर दिले. यावेळी संघर्ष समितीच्या वतीने तुळजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना दुष्काळी आनुदान,अतिवृष्टी आनुदान, पिकविमा यासह विविध आशा आकरा मागण्याचे निवेदन देण्यात आले. या निवेदनातील मागण्या बाबतीत लवकरच मंत्रालयात बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या मागण्या सोडवण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न केले जातील असे आश्वासन चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. यावेळी दिलीप जोशी, सरदारसिग ठाकूर, व्यंकट पाटील, महादेव बिराजदार, अशोक पाडोळे, गुलाब शिदे, अजमोद्दीन शेख, बालाजी ठाकूर, लक्ष्मण निकम, दिलीप पाटील, काशिनाथ काळे, तोलु पाटील, प्रताप ठाकूर, सिमिताबाई माधव हाडे, सचिन जवळगे, छोटुसिग ठाकूर, दशरथसिग ठाकूर, कालीदास जाधव यांच्यासह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आता फक्त शंभर रुपयातच होणार दस्तनोंदणी

## शेतवाटणी करताना शेतकऱ्यांचे पैसे वाचणार




आरंभ मराठी | धाराशिव

राज्य शासनाच्या महसूल विभागाने शेतजमीन वाटणीपत्राच्या दस्त नोंदणीस लागणारी फी माफ केल्याने शेतकऱ्यांवर बसणारा आर्थिक भुर्दंड कमी होऊन भावकीतील वाद मिटण्याबरोबरच कायदेशीररीत्या शेत वाटणीचा मार्ग आता मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे यापुढे अवघ्या १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर वाटणी प्रक्रिया पूर्ण होऊ शकणार आहे. शासनाच्या या निर्णयामुळे कायद्याने नोंदणी झाल्यामुळे मालकी हक्क स्पष्ट होण्यास मदत होणार आहे. शेतजमिनीत अनेक भागधारकांचा हिस्सा असतो. शेतकऱ्यांनी आपली जमीन आपल्या वारसांना वाटप केलेली असते. परंतु, त्याची दस्त नोंदणी झालेली नसते. त्यामुळे वारस नोंदणीवरून भावभावकीत आणि भावंडांत भांडणे होऊन कोर्ट कचेरीचे उंबरठे झिजवावे लागत होते. राज्य शासनाकडून शेती आणि बिगर शेती जमिनीच्या नोंदणीस फी आकारली जात होती. यापूर्वी वाटणीपत्र करताना जमिनीच्या एकूण मूल्याच्या १ टक्के आणि ३० हजारपर्यंत खर्च येत होता. शेतजमिनीसाठी मुद्रांक शुल्क १०० रुपये एवढेच होते. परंतु, नोंदणी फी जास्त होती. त्यामुळे अनेक शेतकरी नोंदणी करणे टाळत होते. आर्थिक कारणांमुळे या वाटणीवरून कुटुंबांमध्ये मालकी विवाद निर्माण होण्याचे प्रमाणही वाढले होते. महसूल विभागाच्या क्रांतिकारी निर्णयामुळे यापुढे केवळ शंभर रुपयात वाटणीपत्र करता येणे शक्य झाले आहे.

### कुटुंबातील वाद कमी होण्यास मदत होणार

पूर्वी भारतीय कुटुंब व्यवस्थेत एक ते तीन पिढ्यांपर्यंत एकत्रित कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. कुटुंबात पूर्वी शेतवाटणी भावाभावांच्या समन्वयातून व्हायची. अलीकडे शेत वाटणीत कुटुंब व्यवस्थेतही समन्वयाची भावना कमी होत असल्याने दस्त नोंदणी खर्च कोणी करायचा, असा प्रश्न निर्माण होत होता. दस्त नोंदणीचा खर्च करण्यासाठी देखील वाद होत होता. आता शासनाने नोंदणी शुल्क माफ केल्यामुळे कुटुंबातील वाद कमी होण्याबरोबरच दस्त नोंदणी होण्यास मदत होणार आहे.

### शेतकऱ्यांवरील आर्थिक भार होणार हलका

दस्त नोंदणी करताना शेतकऱ्यांवरील आर्थिक भार कमी होऊन, नोंदणी फी माफ असल्याने शेतकरी वारसा हक्काच्या जमिनीची दस्त नोंदणी करण्यास यापुढे प्राधान्य देतील. त्यामुळे कायदेशीर मालकीची नोंदणी झाल्याने भविष्यातील वाद कमी होईल. वाटणीवरून कुटुंबातील तसेच भावकीतील होणाऱ्या वादावर आळा बसेल. आर्थिक आणि सामाजिक दृष्टीकोनातूनही या निर्णयाचा फायदा होणार आहे.

### ही कागदपत्रे लागणार

वाटणी पत्र, जमिनीचा नकाशा, शेतजमीन मालकांचे ओळखपत्र, वारसदारांचे ओळखपत्र, घराण्याच्या कुटुंबाचा उत्पत्तीचा पुरावा, इतर कायदेशीर कागदपत्रे एवढ्या कागडपत्रामध्ये दस्त नोंदणी होणार आहे.

# शासकीय आयटीआयमधील विद्यार्थी महावितरण व महापारेषण पदभरतीत चमकले

आरंभ मराठी | धाराशिव



व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय अंतर्गत भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था धाराशिव मधील वीजतंत्री व तारतंत्री व्यवसायामधील प्रशिक्षणार्थ्यांनी महापारेषण व महावितरण पदभरतीमध्ये उपकेंद्र सहाय्यक व विद्युत सहाय्यक या पदाच्या परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रवीणजी औताडे, संस्थेचे प्राचार्य संतोषजी कांबळे, ग.नि. राऊत एस.टी., ग.नि गाडेकर पी. एस., शि.नि. नाईक के. डी., शि.नि.सौदागर आर.डी., शि.नि. शिंदे एस. ए., शि.नि.कु जेऊघाले पी. एन. यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थ्यांनी यश संपादन केले. निवड झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे. यामध्ये महावितरणच्या विद्युत सहायक पदी २१ विद्यार्थी चमकले तर टेक्निशियन पदावर २ विद्यार्थी चमकले. शासकीय आयटीआय मधील विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादित केले असून, यापुढील काळात देखील संस्थेतील विद्यार्थी शासकीय सेवेत दाखल होतील असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

आपलं धाराशिव

शुक्रवार,दि .8 ऑगस्ट 2025

# गोरगरिबांचे पैसे बुडवणाऱ्या पार्वती मल्टिस्टेट विरोधात धरणे आंदोलन;जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

## २४ ऑगस्टपर्यंत पैसे न दिल्यास राष्ट्रीय महामार्ग रोखण्याचा शेतकरी नेते अनिल जगताप यांचा इशारा




आरंभ मराठी | धाराशिव

उमरगा व लोहारा तालुक्यातील गोरगरीब जनतेचे पैसे बुडवणाऱ्या पार्वती मल्टिस्टेट विरोधात गुंतवणूकदार नागरिकांनी गुरुवारी (दि.७) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. यावेळी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. पार्वती मल्टीस्टेट बँकेने खातेदारांचे पैसे २४ ऑगस्टपर्यंत परत न केल्यास २५ ऑगस्टला लोहारा तालुक्यातील आष्टामोड येथील राष्ट्रीय महामार्ग रोखणार असल्याचा इशारा शेतकरी नेते अनिल जगताप यांनी दिला. पार्वती मल्टीस्टेट बँकेने आर्थिक फसवणूक केलेल्या नागरिकांनी अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रचंड आक्रमक होत व घोषणाबाजी करत धरणे आंदोलन केले. न्यायालयीन लढाई सोबतच रस्त्यावरची लढाई देखील अनिल जगताप यांच्या नेतृत्वात खातेदारांनी सुरू केलेली आहे. पार्वती मल्टीस्टेट बँकेत मुद्दल व व्याज मिळून जवळपास साडेतीनशे ते चारशे खातेदारांचे २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम अडकली आहे. यासंदर्भात ईडी, गृह, सहकार आणि अर्थ या खात्याकडे स्वतंत्र चार याचिका गेल्या आठवड्यातच अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली ठेवीदारांने मुंबई येथे दाखल केल्या आहेत. पुढील आठवड्यात मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठात दोन स्वतंत्र याचिका देखील दाखल करण्यात येणार आहेत. गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झालेल्या धरणे आंदोलनात ठेवीदारांनी आपल्या व्यथा मांडल्या. तसेच यावेळी आक्रोश देखील पाहायला मिळाला. बँकेत ठेवी अडकलेल्या खातेदारांमध्ये विधवा महिला, अपंग तसेच देशाच्या रक्षण करणाऱ्या जवानांचा देखील समावेश होता. पोटाला पीळ मारून रुपया रुपया जमा केलेल्या खातेदारांचा प्रचंड आक्रोश जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पहायला मिळाला. यावेळी सर्वच खातेदारांनी अनिल जगताप जो निर्णय घेतील तो मान्य असेल असे म्हणत अनिल जगताप यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला. जगताप यांनी त्यांच्या भाषणात बँकेने ठेवीदारांचे पैसे जर २४ ऑगस्ट पर्यंत दिले नाहीत तर २५ ऑगस्टला आष्टा मोड येथील राष्ट्रीय महामार्ग अडवण्याची घोषणा केली. यावेळी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांना निवेदन दिले. जिल्हाधिकारी यांनी कालच जिल्हा उपनिबंधक धाराशिव यांना या संदर्भात सूचित केले असल्याचे सांगितले. तसेच येत्या सोमवारी उपनिबंधक बँकेचे संचालक मंडळ, खातेदार, ईडीचे अधिकारी व सर्व संबंधित यंत्रणा यांची बैठक कुठल्या दिवशी घ्यायची याचा निर्णय करू असे सांगितले. सोमवारी जिल्हाधिकारी यांच्याकडून बैठकीची तारीख मिळाल्यानंतर बैठकीत काय तोडगा निघेल याविषयी आता खातेदारांमध्ये उत्सुकता वाढली आहे. मात्र, अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली खातेदार आता संघटित झाले आहेत. दिलेल्या निवेदनामध्ये बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करा, संचालकांची मालमत्ता जप्त करा, जे संचालक गुन्हा करून बाहेर फिरत आहेत त्यांना तातडीने अटक करा अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. या आंदोलनात महिलांनी देखील उत्स्फूर्त सहभाग नोंदवला

# कळंब-लातूर रस्त्यावरील अपूर्ण कामांमुळे जीवितहानी; शिवसेना आक्रमक, तीव्र आंदोलनाचा इशारा

आरंभ मराठी | कळंब

कळंब – लातूर रस्त्यावरील अपूर्ण कामांमुळे अनेक निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागला आहे या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा गट) आणि स्थानिक नागरिक आक्रमक झाले असून, तीव्र आंदोलनाचा इशारा निवेदनाद्वारे प्रशासनाला देण्यात आला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याचे काम अपूर्ण असून, खडकी गावाजवळील अरुंद पुलावर अपघात होऊन प्रकाश महाजन आणि मंगेश महाजन या दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. यानंतर आमदार कैलास घाडगे पाटील यांनी दिनांक १० मे २०२५ रोजी पोलीस अधिक्षकांना पत्र पाठवून संबंधित अभियंता व कंत्राटदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. त्याआधीही त्यांनी कार्यकारी अभियंता, लातूर आणि अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई यांना पत्राद्वारे सूचना दिल्या होत्या. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

त्यानंतर कळंब शहरातील तरुण व्यापारी कै. रमेश होनराव यांचा करंजकल्ला गावाजवळील अरुंद वळणावर, चेतावणी फलक नसल्यामुळे दुर्दैवी अपघातात मृत्यू झाला. तसेच डिकसळ पाटी, त्रिवेदी कॉम्प्लेक्स, छत्रपती संभाजीराजे चौक या ठिकाणी नेहमीच मोठी वर्दळ असूनही गतिरोधक नसल्यामुळे अनेक छोटे–मोठे अपघात घडत आहेत.

या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा) स्टाईलने तीव्र स्वरूपाचे रस्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा तहसीलदार यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनावर तालुका प्रमुख सचिन काळे, माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा, प्रा. डॉ. संजय कांबळे, प्रदीप मेटे, शहर प्रमुख विश्वजीत जाधव, युवासेना तालुका प्रमुख पंडित देशमुख, उपशहर प्रमुख निर्भय घुले, शाम खबाले, संतोष लांडगे, प्रा. दिलीप पाटील, गोविंद जोगदंड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### तालुका व्यापारी महासंघाचाही इशारा, रक्षाबंधनपूर्वी उपाययोजना करा

तालुका व्यापारी महासंघ, कळंब यांनी देखील निवेदनाद्वारे प्रशासनास इशारा दिला आहे. रक्षाबंधन काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. अशा सणासुदीच्या काळात करंजकल्ला वळणावर आणखी एखाद्या बहिणीचा भाऊ अपघातात गमावू नये, यासाठी तातडीने खालील उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे: करंजकल्ला वळणावर स्पीड ब्रेकर, चेतावणी फलक आणि दिव्यांची त्वरित व्यवस्था करावी, वळणाची रचना बदलून सुरक्षित वळण तयार करावे, भविष्यातील अपघात टाळण्यासाठी स्थायी उपाययोजना कराव्यात, जर वरील मागण्या त्वरित पूर्ण करण्यात आल्या नाहीत, तर स्थानिक व्यापारी व नागरिकांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडण्यात येईल, असा थेट इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर तालुकाध्यक्ष नंदकिशोर मोरे, शहराध्यक्ष मयूर रुणवाल, तालुका सचिव बालाजी बावळे यांच्यासह अनेक व्यापाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# महसूल मंत्र्यांचे कर्मचारी संघटनेच्या वतीने स्वागत




आरंभ मराठी | धाराशिव

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे धाराशिव येथील जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने त्यांना विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी कर्मचारी संघटनेने महसूल विभागाचा २००६ या वर्षापासून प्रलंबित असलेला महसूल विभागाचा आकृतिबंध मंजूर करून तो तात्काळ लागू करण्यात यावा, नायब तहसीलदार संवर्गाचे वेतनत्रुटीचे निराकरण करून ४३०० ग्रेड श्रेणी (–१४) ऐवजी ४८०० ही ग्रेड वेतन श्रेणी (–१७) मंजूर करावी आणि महसूल सहाय्यक (लिपीक) या संवर्गाचे मुळ वेतनत्रुटीचे निराकरण करून त्यांना ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) या संवर्गासाठी मंजूर असलेले २४०० ग्रेड वैतन श्रेणी मंजूर करण्यात यावी या मागण्यांचे निवेदन महसूल मंत्र्यांना दिले. मंत्री महोदयांनी संघटनेच्या मागण्या लवकरात लवकर पूर्ण करण्याचे प्रयत्न केले जातील असे आश्वासन दिले.

# परंडा येथील प्रणिती कंप्यूटर सेंटरचा पुरस्काराने सन्मान




आरंभ मराठी | परंडा

परांडा येथील प्रणिती कंप्यूटर सेंटरला सर्वोत्कृष्ट संगणक प्रशिक्षण केंद्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नुकत्याच छ. संभाजी नगर येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये एम.के.सी.एल. मार्फत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. गेल्या १८ वर्षांपासून परांडा शहर आणि परिसरातील हजारो विद्यार्थ्यांना काळानुरूप संगणक प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंरोजगार देणाऱ्या या संस्थेला हा मानाचा पुरस्कार मिळाला आहे. यावेळी धाराशिव जिल्हा समन्वयक धनंजय जेवळीकर, विभागीय सल्लागार बालकिशन बलदावा, विभागीय समन्वयक गजानन कुलथे, वरीष्ठ जनरल मॅनेजर अतुल पतोडी, अमित रानडे तसेच छ.संभाजी नगर विभागातील सर्व केंद्र चालकांची उपस्थिती होती. प्रणिती कंप्यूटर सेंटरला मिळालेल्या या पुरस्काराचे श्रेय हे सर्व विद्यार्थी आणि पालकांनी ठेवलेल्या विश्वासाला जाते असे मत संचालिका निशिगंधा सोनवणे यांनी व्यक्त केले.

# सर्वसामान्य नागरिकांना चॅटबोटच्या माध्यमातून मिळणार विविध योजनांची माहिती व लाभ

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते चॅटबोटचे उद्घाटन

आरंभ मराठी | धाराशिव



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते गुरुवारी (दि.७) जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात चॅटबोटचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील, आमदार प्रवीण स्वामी, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,पोलीस अधीक्षक श्रीमती अशफत आमना, अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, उपजिल्हाधिकारी शिरीष यादव, प्रवीण धरमकर, संतोष राऊत, श्रीमती अरुणा गायकवाड, जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे,उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, संजय पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वसामान्य नागरिकांना घरबसल्या चॅटबोटच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती मिळून त्या योजनांचा लाभ घेणे सोयीचे होणार आहे. सध्या चॅटबोटवर ११ सेवांची माहिती उपलब्ध आहे.अर्ज भरणे व नागरिकांच्या प्रश्नाचे समाधान चॅटबोटच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.यामध्ये ज्या ११ योजनांचा समावेश करण्यात आला आहे,त्यामध्ये शेत रस्ते,शेतकरी आत्म हत्या,नैसर्गिक आपत्ती अनुदान वाटप,संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ सेवा योजना,पिक विमा योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, अन्न व नागरी पुरवठा, नैराश्यविरोधी हेल्पलाइन,स्वातंत्र्य सैनिक योजना आणि आणीबाणी काळ बंदी योजना या योजनांचा समावेश आहे. या योजनेशी संबंधित अधिकाऱ्यांचे भ्रमणध्वनी देण्यात आले आहे.वरील योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी चॅटबोटला प्रश्न विचारल्यास तात्काळ प्रश्नाचे उत्तर मिळणार आहे.चॅटबोटची सेवा ही २४ तास उपलब्ध राहणार आहे. चॅटबोटच्या माध्यमातून मिळणाऱ्या सेवांचा नागरिकांनी लाभ घ्यावा.असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले आहे.यावेळी सर्व तहसीलदार उपस्थित होते.

# मुरुम महसूल मंडळाला अतिवृष्टी अनुदानात वगळल्याने शेतकऱ्यांचे आंदोलन

## महसूलमंत्र्यांच्या कार्यक्रमापूर्वी संतप्त शेतकऱ्यांचा ठिय्या





आरंभ मराठी | मुरुम

ऑक्टोबर २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे उमरगा व लोहारा तालुक्यांतील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असताना मुरुम महसूल मंडळाचा अतिवृष्टी अनुदान योजनेतून वगळण्यात आल्याने संतप्त शेतकऱ्यांनी गुरुवारी (ता. ७ ऑगस्ट) रोजी तीव्र आंदोलन छेडले. मुरुम शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन करत शासनाच्या अन्यायकारक निर्णयाचा तीव्र निषेध नोंदवला. शेतकऱ्यांचा आरोप आहे की, शासनाच्या पंचनाम्यानुसार मुरुम महसूल मंडळात ३३ टक्क्यांपेक्षा अधिक शेतीचे नुकसान झाले असतानाही योजनेतून वगळल्यामुळे शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवण्यात आले आहे. याअगोदरही अशाच प्रकारे अन्याय झाला असून, मागील वेळी देखील आंदोलनानंतरच मुरुम महसूल मंडळाचा समावेश करण्यात आला होता. याच पार्श्वभूमीवर सायंकाळी मुरुमजवळील विठ्ठलसाई सहकारी साखर कारखाना येथे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शेतकरी मेळाव्याच्या आधीच असंख्य शेतकरी रस्त्यावर उतरले. त्यांनी रोष व्यक्त करत प्रशासनाबाबत आपली नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या वतीने महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले की, मध्यवर्ती असूनही मुरुम महसूल मंडळाला सातत्याने योजनांमधून वगळण्यात येतो. यामुळे शासनाची भूमिका शंकास्पद वाटत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या आंदोलनात पत्रकार मोहन जाधव, सामाजिक कार्यकर्ते लखन भोंडवे, अजित चौधरी, प्रा. दत्ता इंगळे यांनी तीव्र रोष व्यक्त करत विचारले की, ''मुरुमच्या चारही बाजूंचे महसूल मंडळ अतिवृष्टी अनुदान योजनेत असूनही मुरुमला डावलले जाणे, हा अन्याय नव्हे तर कटकारस्थान आहे.'' या आंदोलनात बाबा कुरेशी, राहुल वाघ, चंद्रशेखर मुदकन्ना, राजेंद्र शिंदे, संजय सावंत, श्रीधर इंगळे, गणेश कडगंचे, गोविंद सोबाजी, राजेंद्र बेंडकाळे, विशाल व्हनाळे, बाळासाहेब खंडागळे, संजय बेंडकाळे, आनंद भुसाळे, राजू इंगळे, हनुमंत वागदरे, बब्रुवान जाधव, प्रवीण फुगटे, मेहबूब गवंडी, प्रल्हाद माने, विशाल मोहिते, राहुल सत्रे, किशोर शिंदे, गौस मुल्ला, नंदकुमार शिंदे, भालचंद्र बेंडकाळे, संतोष मुदकन्ना, बाळासाहेब गिरिबा यांच्यासह विविध राजकीय व सामाजिक संघटनांचे नेते व कार्यकर्ते उपस्थित होते. शेतकऱ्यांनी इशारा दिला आहे की, जर मुरुम महसूल मंडळाचा तात्काळ अतिवृष्टी अनुदान योजनेत समावेश करण्यात आला नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल.

# काळा लिंबाळा येथील शाळकरी विद्यार्थ्यांना संगणक साहित्य वाटप

## सरस्वती अनाथ शिक्षण संस्था, दापोडी पुणे यांचा स्तुत्य उपक्रम



आरंभ मराठी | उमरगा

शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याच्या उद्देशाने सरस्वती अनाथ शिक्षण संस्था, दापोडी पुणे यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, काळा लिंबाळा येथे गुरुवारी रोजी विद्यार्थ्यांना संगणक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक बिराजदार सर, शिक्षक व कर्मचारी, तसेच संस्थेचे संस्थापक देविदास सुरवसे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर दासमे, गावातील नागरिक दिगंबर पाटील, राहुल सुरवसे, योगेश सुरवसे, तसेच क्रांतीज्योत मंडळाचे अध्यक्ष मधुकर सुरवसे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना संगणकाचे महत्त्व, त्याचा अभ्यासात होणारा उपयोग, व डिजिटल शिक्षणाच्या संधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना मिळालेल्या संगणक साहित्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाशी प्रत्यक्ष संपर्क येणार असल्यामुळे त्यांच्यात नवचैतन्य निर्माण झाले आहे. मान्यवरांनी शिक्षण क्षेत्रात तांत्रिक साधनांची गरज अधोरेखित करत, अशा उपक्रमांचे सातत्य राखणे काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. संस्थेच्या या उपक्रमाचे पालक व ग्रामस्थांकडून मोठे कौतुक होत आहे.